# जागतिक मृदा दिवस ५ डिसेंबर, २०२४
# शाश्वत उत्पादनासाठी जमिनीची काळजी घेणे गरजेचे

---

कृषी विज्ञान केंद्र धुळे, आत्मा धुळे आणि लुपिन फौंडेशन, धुळे यांच्या संयुक्त विध्यमाने साक्री तालुक्यातील छावडी या गावी दि. ५ डिसेंबर रोजी "जागतिक मृदा दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून शेतकरी बांधव व ग्रामीण युवकांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. दिनेश नांद्रे (कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र धुळे) यांनी भूषविले. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. हितेंद्र सोनवणे (प्रकल्प संचालक, आत्मा धुळे), श्री. निलेश पवार (मॅनेजर, लुपिन फौंडेशन, पुणे), श्री. लोटन शंकर मासुळे (सरपंच, छावडी), डॉ. पंकज पाटील, श्री. जगदिश काथेपुरी आणि डॉ. अतिश पाटील (शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, धुळे) हे उपस्थिती होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षणीय भाषणात डॉ. दिनेश नांद्रे (कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र धुळे) यांनी शाश्वत उत्पादनासाठी जमिनीची काळजी घेण्याचे आवाहन केले. रासायनिक खते आणि पाण्याच्या चुकीच्या वापराने जमिनी दिवसेंदिवस नापीकी बनत आहेत. जमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी कृषि विद्यापीठांनी संशोधित केलेल्या शिफारशींचा अवलंब करणे गरजेचे आहे. माती हिच अन्नाची जननी आहे आणि तिचे संवर्धन करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवावा लागेल असे ते म्हणाले. पिकांची फेरपालट, हिरवळीचे खते आणि सेंद्रिय खतांचा वापर करणे आता काळाची गरज बनली आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. अतिश पाटील (मृदा शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, धुळे) यांनी "जमिनीची काळजी– मोजन, निरीक्षण आणि व्यवस्थापन" या विषयावर उपस्थितांना संबोधित केले. जमिनीची सुपीकता आणि उत्पादन क्षमता टिकवण्यासाठी माती – पाणी परीक्षण गरजेचे आहे. जमिनीच्या आरोग्यावरच मानवाचे आरोग्य अवलंबून असते. मातीमध्ये अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास त्याची लक्षणे पिकांवर दिसून येतात. आणि त्याच कमतरता मानवी शरीरामध्ये आढळून येतात. हे एक दृष्ट चक्र आहे. हे सर्व टाळण्यासाठी पिकांची अन्नद्रव्यांची गरज ओळखून एकात्मिक खत व्यवस्थापन करायला हवे असे डॉ. अतिश पाटील म्हणाले.

श्री. हितेंद्र सोनवणे (प्रकल्प संचालक, आत्मा धुळे) यांनी जमीन आरोग्य व्यवस्थापनासाठी कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. श्री. निलेश पवार (मॅनेजर, लुपिन फौंडेशन, पुणे) यांनी लुपिन फौंडेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबवत असलेल्या विविध कार्यांची माहिती दिली. डॉ. पंकज पाटील (शास्त्रज्ञ, पिक संरक्षण) यांनी ड्रोन तंत्रज्ञानाचे महत्व सांगून ड्रोन उडवण्याचे कृती प्रात्येक्षिक दाखवीले. श्री. जगदिश काथेपुरी (शास्त्रज्ञ, कृषिविद्या) यांनी कापूस, गहू आणि हरबरा लागवड तंत्रज्ञान विषयी माहिती दिली.

सदर शेतकरी प्रशिक्षणाप्रसंगी निजामपूर कार्यक्षेत्रातील २१ गावातील जवळपास २४० शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. उमाकांत साळुंके यांनी तर आभार प्रदर्शन श्री. प्रशांत देसले यांनी मानले.







